प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

नोव्हेंबर 29, 2017

**आपल्या नावात 'बँक'हा शब्द वापरणा-या निरनिराळ्या सोसायट्यांविरुध्द सावधानतेचा इशारा**

भारतीय रिझर्व बँकेच्या (आरबीआय) नजरेस आले आहे की, काही सहकारी सोसायट्या त्यांच्या नावात 'बँक'हा शब्द वापरत आहेत. असे करणे हे, बँकिंग विनियामक अधिनियम, 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) (बीआर अधिनियम 1949) कलम 7 चे उल्लंघन आहे.

आरबीआयच्या असेही नजरेस आले आहे की, काही सहकारी सोसायट्या, सभासद नसलेल्या/नाममात्र सभासद असलेल्या/सहाय्यक सभासद असलेल्या व्यक्तींकडून ठेवी स्वीकारत असून, ते बीआर अधिनियम 1949 च्या तरतुदींचे उल्लंघन आहे.

येथे जनतेला सांगण्यात येते की, अशा सोसायट्यांना बीआर अधिनियम 1949 खाली कोणताही परवाना देण्यात आला नाही आणि बँकिंग व्यवसाय करण्यास त्यांना आरबीआयकडून प्राधिकृतही करण्यात आलेले नाही. अशा सोसायट्यांमध्ये ठेवलेल्या ठेवींना, डिपॉझिट इन्शुअरन्स अँड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन (डीआयसीजीसी) कडून विमा संरक्षण उपलब्ध नाही. अशा सहकारी सोसायट्यांबरोबर व्यवहार करताना सावधानता बाळगून पूर्ण चौकशी करण्यास जनतेला सांगण्यात येत आहे.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/1467**